# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — पुणे/पिंपरी-चिंचवड — गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ — वर्ष - १ ■ अंक - ५२ ■ पाने - ४


## सुविचार


"मनावर विजय मिळवणं म्हणजे आयुष्यावर विजय मिळवणं. विचारांचे शस्त्र हातात घेतले तर कोणतीही परिस्थितीवर मात करता येते.

# दिल्ली स्फोटाचं आंतरराष्ट्रीय कनेक्शन?

## उमर-मुझम्मिलच्या तुर्की भेटीचे पुरावे समोर; टेलिग्राम ग्रुपवर 'जैश'शी संपर्क

**नवी दिल्ली : दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या आय-20 कार स्फोटानंतर संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असताना, या स्फोटामागे केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय दहशतवादी कनेक्शन असल्याचे धक्कादायक संकेत समोर आले आहेत. तपास यंत्रणांना मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अटकेत असलेल्या संशयित आरोपी डॉ. मोहम्मद उमर आणि डॉ. मुझम्मिल शकील यांच्या पासपोर्टवर तुर्की दौऱ्याच्या नोंदी आढळल्या आहेत. या पुराव्यांमुळे या संपूर्ण कटामागे आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना कार्यरत असल्याचा संशय बळावला आहे.**





सोमवारी सायंकाळी लाल किल्ला परिसरात उभी असलेल्या आय-20 कारमध्ये झालेला स्फोट उमर मोहम्मद चालवत असताना घडल्याचे समोर आले आहे. तपासात उमरचे फरीदाबादमध्ये उघड झालेल्या दहशतवादी मॉड्यूलशी संबंध असल्याची पुष्टीही झाली आहे. त्यामुळे आता तपासाचा फोकस दिल्लीपासून तुर्कीपर्यंत विस्तारला आहे. पोलिस आणि गुप्तचर यंत्रणा उमर आणि मुझम्मिल यांच्या परदेश प्रवासाची तपशीलवार चौकशी करत असून, तुर्कीमधील त्यांच्या हालचालींचा माग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे.

टेलिग्राम ग्रुपवर सक्रिय होते दोघे आरोपी इंडिया टूडेच्या वृत्तानुसार, तपास यंत्रणांनी या दोघांच्या डिजिटल उपकरणांची तपासणी केली असता, त्यांनी काही टेलिग्राम चॅनेल आणि ग्रुप्स जॉईन केले होते, ज्याद्वारे त्यांचा 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेच्या ऑपरेटिव्हसशी संपर्क झाला होता. या ग्रुप्सपैकी दोन प्रमुख ग्रुप उमर बिन खट्टाब नावाच्या जैशच्या ऑपरेटिव्हकडून चालवले जात असल्याचं समोर आलं आहे. या ग्रुप्सवरून उमर आणि मुझम्मिल यांना भारतातील "व्हाइट कॉलर मॉड्यूल" पसरवण्याचे आदेश मिळाले होते, असं सूत्रांचं म्हणणं आहे.

याच ग्रुपद्वारे त्यांचं फरीदाबाद मॉड्यूलशी कनेक्शन झालं. त्या मॉड्यूलमधील काही सदस्यांना याआधीच अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनंतर दिल्ली स्फोटातील धागेदोरे अधिक स्पष्ट होत आहेत. पोलिसांनी या सर्व टेलिग्राम नेटवर्कचा मागोवा घेतला असून, काही ग्रुप आता डिलीट केलेले आहेत. सायबर सेल त्यांचे बॅकअप रेकॉर्ड मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. फरीदाबाद मॉड्यूलचा दुवा आणि पुढील तपास उमर आणि मुझम्मिल यांच्या चौकशीत फरीदाबादमधील दहशतवादी गटाशी असलेले त्यांचे संबंध अधिक स्पष्ट झाले आहेत. या गटाने देशातील विविध ठिकाणी स्लीपर सेल तयार करण्याचे काम केले असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी उमरच्या निवासस्थानातून अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे, पासपोर्ट, परदेशातील संपर्क क्रमांक आणि काही संशयास्पद दस्तऐवज जप्त केले आहेत.

सध्या दिल्ली पोलिस, राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) आणि दहशतवाद विरोधी पथक (ATS) या प्रकरणाच्या तपासात एकत्रितपणे कार्यरत आहेत. टेलिग्रामवरील विदेशी नेटवर्क, आर्थिक व्यवहार आणि प्रवासाच्या नोंदींची सखोल छाननी सुरू आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे की, भारतातील दहशतवादी कारवाया आता डिजिटल माध्यमांतून आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधून राबवल्या जात आहेत. त्यामुळे सायबर मॉनिटरिंग आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी सहकार्याची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे.

### २६ जानेवारीलाच करायचा होता मोठा घातपात?

पीटीआयच्या अहवालानुसार, अटकेत असलेल्या आरोपी डॉ. मुझम्मिल गनी याने या वर्षी जानेवारी महिन्यात लाल किल्ल्याच्या परिसरात अनेक वेळा टेहळणी केली होती. पोलिसांनी त्याच्या मोबाइल डेटाचे विश्लेषण केल्यानंतर ही माहिती समोर आली आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, या दहशतवादी गटाने २६ जानेवारी रोजी लाल किल्ल्यावर मोठा घातपात करण्याची योजना आखली होती. मात्र, त्या दिवशी सुरक्षेचा बंदोबस्त अत्यंत कडक असल्याने ते आपली योजना अंमलात आणू शकले नाहीत.

## सारांश वृत्त

### उत्तर पुणे जिल्ह्यात बिबट्याची दहशत; नागरिक भयभीत

**पुणे :** उत्तर पुणे जिल्ह्यात बिबट्याच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. दिवसा बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली आहे. शेतात काम करताना जीवितहानीचा धोका निर्माण झाल्याने नागरिकांनी वनविभागाकडे तात्काळ संरक्षणात्मक उपाययोजनांची मागणी केली आहे. बिबट्याची ही दहशत आता फक्त जीवघेणी न राहता सामाजिक संकटाचं रूप घेत आहे. प्रशासनाकडून तत्काळ कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महानगरी एक्सप्रेसमध्ये बॉम्बची अफवा; प्रशासन अलर्ट

**मुंबई :** महानगरी एक्सप्रेसमध्ये बॉम्ब असल्याची अफवा पसरल्यानंतर रेल्वे प्रशासन अलर्ट मोडवर आलं आहे. एका प्रवाशाने शौचालयात "पाकिस्तान जिंदाबाद, आयएसआय जिंदाबाद, बॉम्ब फुटने वाला है" असे शब्द लिहिलेले पाहिल्याची माहिती दिली. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. रेल्वे आणि सुरक्षा यंत्रणांनी तात्काळ तपास सुरू केला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

### अभिनेते धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज; तब्येत स्थिर

**मुंबई :** बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पुढील उपचार आता त्यांच्या घरीच केले जाणार आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. दरम्यान, काल त्यांच्या निधनाची अफवा सोशल मीडियावर पसरली होती, मात्र ती पूर्णपणे खोटी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. चाहत्यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल धर्मेंद्र यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## विशेष संपादकीय

### राजकारणाचा थर्मामीटर नाशिकमध्ये उकळतोय

**नाशिकमध्ये झालेल्या महाविकास आघाडी–मनसे युतीच्या निर्णयाने महाराष्ट्राच्या राजकारणाचं तापमान अचानक वाढलं आहे. स्थानिक पातळीवरील हा प्रयोग पुढच्या मोठ्या राजकीय समीकरणाची चुणूक ठरू शकतो. विरोधक आता भाजपविरोधात एकत्र येत असले, तरी त्यांच्या एकतेमागचा हेतू लोकशाहीचा की अस्तित्वरक्षणाचा खरा प्रश्न नाशिकच्या रस्त्यावरून उठतोय...**

नाशिकमधील स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एक अनपेक्षित पण महत्त्वाची राजकीय घटना घडली आहे. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी एकत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने राज्याच्या राजकारणात चर्चेचं वादळ उठलं आहे. हा निर्णय केवळ नगरपंचायतींच्या पातळीवरील तडजोड नाही, तर पुढील विधानसभा आणि महानगरपालिका समीकरणांचं बीज म्हणून पाहावं लागेल. भाजपला रोखण्यासाठी विरोधक एकत्र येत आहेत, हे गेल्या काही वर्षांतील नवीन वास्तव आहे. मात्र या वेळी विशेषत्वाने लक्ष वेधून घेतंय ते म्हणजे राज ठाकरे यांची मनसे — जी नेहमी स्वतंत्र भूमिकेचा अभिमान बाळगणारी पक्षसंस्था राहिली — तीच आता आघाडीच्या छत्राखाली आली आहे. मनसे नेते दिनकर पाटील यांनी "लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी ही आघाडी आवश्यक" असल्याचं सांगितलं, पण या विधानामागे राजकीय गणिताचा स्पष्ट हिशोब दडलेला आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ पातळीवर या निर्णयाला विरोध असला, तरी स्थानिक नेत्यांनी आपली दिशा ठरवली आहे. हे महाराष्ट्राच्या नव्या राजकीय संस्कृतीचं लक्षण आहे. आता प्रत्येक जिल्हा आपलं राजकारण स्वतः ठरवतो, आणि वरच्या पातळीवरील आदेशाची वाट पाहत नाही. नाशिकमधील काँग्रेस–मनसे समन्वय हे त्याचं ज्वलंत उदाहरण आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघे पुन्हा एकत्र येणार, अशा चर्चांना या युतीनं नवा बळ दिलं आहे. स्थानिक पातळीवर ही युती यशस्वी ठरली, तर मुंबई महानगरपालिकेतील सत्तासमीकरणाचं तापमान पूर्णपणे बदलू शकतं. नाशिकचं राजकारण हे राज्याचं थर्मामीटर आहे. इथलं तापमान वाढलं, की महाराष्ट्रात लाट उठते. आज ते थर्मामीटर उकळत्या स्थितीत आहे. भाजपविरोधी आघाडीची ही नवी रासायनिक प्रतिक्रिया किती काळ टिकते, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. लोकशाही वाचवायची की सत्तासमीकरण वाचवायचं हा प्रश्न आता मतदारांच्या विवेकावर आहे. पण एक गोष्ट नक्की: राजकारणाचा थर्मामीटर नाशिकमध्ये उकळतोय, आणि त्याची ऊष्णता संपूर्ण महाराष्ट्रात जाणवू लागली आहे.

**–डॉ. अशोक बालगुडे, संपादक, दै. राज्य लोकतंत्र**

# महायुतीला दादांचा पुन्हा दे धक्का!

## शरद-अजित पवार युतीच्या पुनरागमनाचा धमाका

**पुणे :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी राजकीय रंगभूमी गरम झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे काका-पुतणे पुन्हा एकत्र येण्याच्या मार्गावर आहेत, त्यामुळे महायुतीला अजितदादांना पुन्हा एकदा दे धक्का मानले जात आहे. अलीकडेच कोल्हापूरमधील चंदगड नगरपालिका निवडणुकीत दोघांनी युती केली होती. यंदाच्या २४६ नगरपालिका आणि १८ नगरपंचायतींसाठी मतदानाच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक पातळीवर पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांना चालना मिळाली आहे.



खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे प्रस्ताव ठेवला असून, अंतिम निर्णय शरद पवारांसोबत चर्चा करून घेतला जाणार आहे. पिंपरी-चिंचवडमधल्या अजित पवारांच्या पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी सांगितले की, ही माहिती अजित पवारांनी स्वतः दिली आहे. यापूर्वीही बीड, चंदगड, बार्शीसह अनेक ठिकाणी भाजपला सत्तेतून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र आलेले आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर पक्ष दोन गटांमध्ये विभागला; अजित पवारांनी महायुतीत सामील होऊन गट तयार केला, तर शरद पवारांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केला. सोशल मीडियावरही शरद-पवार आणि अजित-पवार युतीबाबत चर्चा रंगून आहेत. स्थानिक निवडणुकांसाठी हा निर्णय महायुतीसाठी मोठा धक्का ठरू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.

# 'लाडकी बहीण योजना बंद होणार नाही': उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** राज्य सरकारची मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून महिला वर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झाली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देऊन सक्षमीकरणाचा संदेश देणारी ही योजना अनेक कुटुंबांसाठी आधारस्तंभ ठरत आहे. मात्र, योजनेच्या अटींचा भंग करून काही अपात्र महिलांनी लाभ घेतल्याचं समोर आल्यानंतर प्रशासनाकडून मोठी कारवाई सुरू करण्यात आली आहे.

सरकारच्या नियमानुसार, ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा महिलांनाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे. याशिवाय, लाभार्थीच्या नावावर कोणतेही चारचाकी वाहन नसावे, वय ६५ वर्षांपेक्षा कमी असावे आणि एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन महिलांनाच योजना लागू आहे. तथापि, अनेकांनी या निकषात न बसता लाभ घेतल्यामुळे सरकारने केवायसी प्रक्रिया बंधनकारक केली आहे. या प्रक्रियेतून लाभार्थींची ओळख व पात्रता तपासली जाणार आहे. या पडताळणीमुळे काही महिलांची नावं वगळली जात असल्याने विरोधकांनी सरकारवर "लाडकी बहीण योजना बंद करण्याचा डाव" असल्याचा आरोप केला आहे. या आरोपांमुळे लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, या वादावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, "कोणाच्याही बापाचा मुलगा आला तरी लाडकी बहीण योजना बंद करणार नाही. लाडक्या बहिणी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे हेच आमचे काम आहे," असं शिंदे म्हणाले.

# दिल्ली स्फोटानंतर महाराष्ट्र एटीएसची धडक कारवाई



**मुंबई : दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटानंतर देशभरात सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या घटनेचे धागेदोरे थेट महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्याने खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसरात मोठी कारवाई करत एका शिक्षकाला ताब्यात घेतले आहे. या शिक्षकाची ओळख इब्राहिम आबिदी अशी असून तो कौसा विभागात भाड्याने राहत होता.**

### मुंब्रातील शिक्षक ताब्यात, कुर्ला व ठाण्यात छापेमारी

### लाल किल्ला स्फोट प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत;

### शिक्षकाच्या दोन्ही घरांवर एटीएसचा छापा

पुण्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या चौकशीत या शिक्षकाचे नाव समोर आल्यानंतर एटीएसने तत्काळ मुंब्र्यात छापा टाकला. या कारवाईत आबिदीच्या घरातून लॅपटॉप, मोबाईल फोन आणि संगणक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. प्राथमिक चौकशीत आबिदी दर रविवारी कुर्ल्यातील एका मशिदीत उर्दू शिकवण्यासाठी जात असल्याचे समोर आले आहे. तसेच कुर्ल्यात राहणाऱ्या त्याच्या दुसऱ्या पत्नीकडेही एटीएसने छापेमारी केली. एटीएसला संशय आहे की, संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांना दहशतवादी कृत्यांसाठी प्रवृत्त करत होता. जप्त केलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे तांत्रिक विश्लेषण सुरू असून त्यातून महत्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता आहे. या कारवाईमुळे ठाणे . जिल्ह्यात तसेच मुंबई परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, दिल्ली स्फोट प्रकरणात पोलिसांच्या तपासात अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहेत. स्फोटासाठी वापरलेली इको कार जम्मू-काश्मीरशी संबंधित असल्याचे उघड झाले आहे. पुलवामातील दहशतवादी उमर हा I-20 गाडी चालवत असल्याचे समोर आलं आहे. काही डॉक्टरांनी जानेवारी महिन्यात लाल किल्ल्याची रेकी केल्याचं उघड झालं आहे.

# पोलिसांवर तात्काळ गुन्हा दाखल करा, कोर्टाचा गंभीर आदेश

**मुंबई :** कोथरूड परिसरात तीन मुलींवर कथित मारहाणी आणि जातीवाचक अपमानाच्या प्रकरणावर कोर्टाने पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

पीडित मुलींनी न्यायासाठी पोलीस आयुक्तालयात धरणे दिल्यानंतर चौकशी वेगाने पुढे सरकली. या प्रकरणात कोथरूड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमा पाटील, कर्मचारी श्रुती कडणे, संभाजीनगर पोलीस स्टेशनचे अमोल कामटे, महिला कॉन्स्टेबल संजीवनी शिंदे, हवालदार विनोद परदेशी, सायबर पोलीस धनंजय सानप आणि माजी पोलीस अधिकारी सखाराम सानप यांच्यावर गुन्हा नोंदवण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत.

### कोथरुड प्रकरण : जातीय शिवीगाळ, मारहाणीच्या आरोपांच्या प्रकरण

इतकेच नव्हे तर तपास स्वतंत्रपणे सहाय्यक पोलीस आयुक्तांकडे वर्ग करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. प्रकरणाच्या वाढत्या आवाजावर वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजली आंबेडकर, सुजात आंबेडकर आणि आमदार रोहित पवार यांनी हस्तक्षेप केला होता. सोशल मीडियावर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर टीका झाली आहे.

# मशाल, धनुष्यबाण, तुतारी... ४३५ पक्षांची यादी जाहीर

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी चिन्हांचा संघर्ष सुरूच

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीसाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने ४३५ राजकीय पक्षांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. यामध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभागलेल्या गटांचे चिन्हे स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत. शिवसेना (ठाकरे) गटासाठी मशाल, शिवसेना (शिंदे) गटासाठी धनुष्यबाण, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) साठी घड्याळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) साठी तुतारी वाजवणारा माणूस या चारही चिन्हांना स्वतंत्र स्थान देण्यात आले आहे. आयोगाने स्पष्ट केले आहे की, या चिन्हांवरील अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अवलंबून राहील. पूर्वी लोकसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस आणि पिपाणी या दोन चिन्हांमुळे मत विभाजनाचा आरोप उठला होता. न्यायालयाच्या आदेशानुसार, पिपाणी चिन्ह यादीतून वगळण्यात आले असून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)साठी 'तुतारी वाजवणारा माणूस' कायम ठेवण्यात आला आहे.




हा निर्णय पक्षासाठी मोठा दिलासादायक ठरला आहे. राजपत्रात जाहीर केलेल्या यादीत ५ राष्ट्रीय पक्ष, महाराष्ट्रातील ५ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर राज्यातील ९ राज्यस्तरीय पक्षांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत ४१६ मान्यताप्राप्त पक्षांची चिन्हांसहित यादी प्रकाशित करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदारांच्या हातात हे चिन्हे येताच राजकीय रणनीती आणि मतविभाजनाचे प्रश्न पुन्हा चर्चेत येणार आहेत.


# पुण्यातील रस्ते–पीएमपी प्रवास सहनशीलतेचा कडेलोट; प्रवाशांचा संताप

## झोपी गेलेले प्रशासन जागे कधी होणार

**पुणे : शहरातील रस्त्यांची दुरवस्था आता गंभीर झाली आहे की, पुणे महापालिका परिवहन (पीएमपी) बसमधील प्रवास नागरिकांसाठी 'असुविधेचा' नव्हे, तर 'हादऱ्यांचा' अनुभव ठरत आहे. खड्डे, उंचवटे आणि असमतोल रस्त्यांमुळे बसमध्ये प्रवाशांना बसूनही थरथर कापावे लागत आहे. सहनशीलतेचा कडेलोट झाला आहे, अशी तीव्र संतापाची भावना दै. राज्य लोकतंत्रशी बोलताना प्रवाशांनी व्यक्त केली.**



**बीआरटीची दुरवस्था भाग-३**
**- डॉ. अशोक बालगुडे**




पीएमपी बसने प्रवास करताना प्रवाशांना प्रत्येक थांब्यावर एक हादरा बसल्याशिवाय राहत नाही. बस चालवताना खड्ड्यात बस शिरल्यास प्रवाशांना जोराचा धक्का बसतो. काही वेळा वृद्ध नागरिक आणि लहान मुले सीटवरून खाली कोसळतात. बस चालकांसाठीही रस्त्यावरून सुरळीत वाहन चालविणे कठीण झाले आहे. फायबर सीट्स आणि तुटलेले हँडरेस्ट – प्रवाशांचे नवीन संकट अनुभवावी लागत आहेत. बसच्या कडक फायबर सीट्समुळे पाठीला त्रास होतोच, पण प्रवाशांचे कपडेही तुटण्याची तक्रार वाढली आहे. अनेक बसेसमधील हँडरेस्ट तुटलेले किंवा धारदार झालेले आहेत. महिला प्रवाशांनी विशेष तक्रार केली आहे. "बस पकडताना साडी फाटली, बसमध्ये बसणं आता जोखीमच वाटतं." प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. बसच्या आतील भागाची देखभाल होत नाही. सीटखाली सैल बोल्ट, तुटलेल्या ग्रिप्स, फायबरच्या धारदार कडा – हे सर्व प्रवाशांसाठी अपघाताचे कारण ठरू शकतात. जोराचा आवाज आणि थरथर वृद्ध आणि विद्यार्थ्यांसाठी प्रवास अधिकच कठीण करतात, या बाबी पीएमपी अधिकाऱ्यांनी पाहून त्यावर तातडीने उपाययोजना केल्या पाहिजे, अशी मागणी पल्लवी सुरसे, कल्पना हांडे, वैष्णवी सातव, सीमा सावंत, वर्षा पवार यांनी केली आहे.

> पुणे शहर 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत असल्याचा दावा करीत असले तरी रस्त्यांवरील खड्डे, उंचवटे आणि तुटलेल्या बसेसमुळे नागरिकांना प्रत्यक्ष अनुभव 'अस्मार्ट' मिळतो. चौकातील नागरिकांची वाहने रस्त्यावरच उभी असल्याने वाहतूक ठप्प होते. पादचारी भुयारी मार्ग असूनही त्याचा योग्य वापर होत नाही. उलट, रस्त्याची उंचवटामुळे वाहनांची गती कमी झाली आहे आणि बेशिस्त वाहतूक वाढली आहे.
>
> **-सविता मोरे,** हडपसर

> पुणेकरांसाठी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून खड्डे मुक्त करा. बसमधील सीट्स आणि हँडरेस्ट बदलून सुरक्षित व्यवस्था तातडीने उभारण्याची गरज आहे. दररोजच्या प्रवासात आराम नाही, निदान सुरक्षितता दिली पाहिजे. बीआरटी मार्गाचा उद्देश होता जलद, सुरक्षित आणि शिस्तबद्ध प्रवास असला पाहिजे. मात्र, आज परिस्थिती उलटी झाली आहे.
>
> **- सतीष जगताप,** हडपसर

> बीआरटी मार्गाचा आणि पीएमपी बस प्रवास अत्यंत खडतर झाला आहे. चालकाकडून कचाकच ब्रेक दाबला की प्रवासी एकमेकाच्या अंगावर आदळतात. सुव्यवस्था आणि आधुनिकता यांचा दावा करणाऱ्या योजनेत प्रत्यक्षात नागरिकांचा वेळ आणि संयम वाया जात आहेत. रस्त्यांची पुनर्रचना झाली असली, तरी वाहतुकीची शिस्त हरवली आहे.
>
> **-प्रा. अरुण झांबरे,** मांजरी

## सारांश वृत्त

### घोडगंगाचे माजी उपाध्यक्ष संतोष रणदिवे यांचे निधन



**न्हावरे:** घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष संतोष तुकाराम रणदिवे यांचे निधन झाले. ते ४७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुली, भाऊ, दोन बहिणी, भावजय आणि पुतणे असा मोठा परिवार आहे. रणदिवे यांनी घोडगंगा साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदाच्या कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण केला होता. तसेच त्यांनी शिरूर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही काम केले. संतोष रणदिवे हे घोडगंगा साखर कारखान्याचे माजी संचालक आणि रांजणगाव सांडसचे माजी सरपंच झुंबरआण्णा(तुकाराम) रणदिवे यांचे पुत्र तर विद्यमान सरपंच प्रदिपा संभाजी रणदिवे यांचे दीर होत.


### मलठणमध्ये भाच्याकडून आत्यावर तलवारीने हल्ला; तिघे जखमी

**शिक्रापूर :** मलठण (ता. शिरूर) येथे भाच्याने आत्यावर तलवारने हल्ला केला. या हल्ल्यामध्ये तिघे जखमी झाले. हा प्रकार सोमवारी (दि. १०) घडली. सुरेखा शंकर पंडित (वय ५४, रा. लोणी मावळा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सुरेखा शंकर पंडित यांनी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी त्वरित निखिल राजेंद्र क्षीरसागर, राजेंद्र शांताराम क्षीरसागर व शारदा राजेंद्र क्षीरसागर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुरेखा पंडित या आईकडे आल्या होत्या, त्या घरात भांडी ठेवत असताना तिचा भाचा निखिल क्षीरसागर यांने शिवीगाळ करत, दमदाटी करून तलवारीने हल्ला केला. त्यावेळी सुरेखा यांचा भाऊ राजेंद्र क्षीरसागर व बहिण शारदा क्षीरसागर देखील तू इथे कशाला आलीस अशी दमदाटी करत, हाताने व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात सुरेखा यांना जखम झाली, तर भाऊ आणि बहिण यांचाही मारहाणीत इजा झाली आहे.

# बिबट संघर्ष रोखण्यासाठी उपाययोजना करा

## जितेंद्र डुडी : मानव-बिबट संघर्ष नियंत्रणासाठी बैठक संपन्न

**शिक्रापूर : बिबट हल्ल्याच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. त्याचा टोल-फ्री क्रमांक १८००३०३३ असा जाहीर करण्यात आला आहे. अतिसंवेदनशील गावांमध्ये एआय प्रणाली, सोलार नाईट सर्व्हिलन्स ड्रोन, कॅमेरा ट्रॅप्स आणि साउंड अलर्ट सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. सध्या जुन्नर वनविभागाकडे २६२ पिंजरे उपलब्ध आहेत; आणखी पिंजरे तयार करण्याचे व आवश्यक साहित्य खरेदीचे काम सुरू आहे. जिल्हाधिकारी डुडी यांनी बाहेरील ७०० पिंजरे उपलब्ध करून देऊ शकणाऱ्या पुरवठादार किंवा एजन्सीकडून खरेदी करण्याचे निर्देश दिले. संभाव्य बिबट प्रवण क्षेत्रातील गावांमध्ये तात्काळ पिंजरे उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी त्यांनी दिले.**



पुणे जिल्ह्यातील मानव-बिबट संघर्ष तीव्र होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत संघर्ष नियंत्रणासाठी विविध ठोस निर्णय घेण्यात आले. याप्रसंगी उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, महादेव मोहिते यांसह प्रादेशिक व वन्यजीव विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

डुडी म्हणाले की, १२ ऑक्टोबर २०२५ पासून आतापर्यंत शिरूर व आंबेगाव तालुक्यात १७ बिबटे पकडण्यात आले असून हे सर्व बिबटे माणिकडोह बिबट निवारण केंद्रात हलविण्यात आले आहेत. ग्रामस्तरावर ग्रामसभा घेऊन नागरिकांना उपाययोजनांची माहिती देणे, तसेच ग्रामस्तरीय सहनियंत्रण समिती गठित करणे, यामध्ये अनुभवी व्यक्ती, वन आपदा मित्र, स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसेवकांचा समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले. समितीमार्फत ड्रोन सर्व्हे करून बिबट संख्येची नोंद, गस्त वाढविणे आणि जनजागृती अभियान राबविण्याबाबतही सूचना दिल्या. तसेच, बिबट हल्ल्यांच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आदर्श कार्यपद्धती निश्चित करणे आणि पोलिस अधीक्षकांच्या स्तरावर 'टायगर सेल'च्या बैठका घेऊन समन्वय वाढविणे याचे आदेशही त्यांनी दिले.

# "मृत्यूनंतर तरी दफनासाठी जागा द्या!" : नामदेव भोसले

**दौंड :** "जिवंत असताना राहायला जागा नसेल, तर मृत्यूनंतर तरी दफनासाठी जागा द्या," अशी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन पाटील, भूषण जोशी यांच्याकडे अखिल भारतीय आदिम महासंघाचे राज्याध्यक्ष नामदेव भोसले यांनी निवेदनद्वारे मागणी केली. याप्रसंगी राजेंद्र टिळेकर, पोपटराव ताम्हाणे, बलवर पवार, कुणाल भोसले, बाबा भोसले, सचिन भोसले आदी उपस्थित होते.

भोसले म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून गावात वास्तव्य असूनही पारधी समाजातील लक्ष्मण रीजमीट काळे कुटुंबाला आजवर घरकुल, स्थायी जागा, अन्न सुरक्षा, आरोग्य सुविधा, जात-निवास प्रमाणपत्र वा सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळालेला नाही. गावात ९० वर्षांचा इतिहास असतानाही हे कुटुंब आजही भिक्षावृत्ती करून फुटपाथवर जगत आहे — ही स्थिती मानवी हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. परिस्थिती बिकट होत गेल्याने लक्ष्मण काळे हे गेली २० वर्षे पुण्यातील कॅम्प परिसरात फुटपाथवरच राहून उदरनिर्वाह करत आहेत. पाऊस, ऊन, थंडी यांची पर्वा न करता कोणत्याही सरकारी आधाराशिवाय जगण्याची वेळ त्यांच्या कुटुंबावर आली आहे. २०१० पासून सतत अर्ज व तक्रारी करूनही पंचायत व ग्राम प्रशासनाने जातीय भेदभावामुळे सर्व मागण्या फेटाळल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, काळे कुटुंबाला किमान दोन गुंठे स्थायी जागा मंजूर करावी. घरकुल, अन्न सुरक्षा व आरोग्य सुविधा तत्काळ लागू कराव्यात. जातीय भेदभावाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# नीलेश घायवळविरुद्ध 'मकोका' कायद्यान्वये तिसरी कारवाई

## महिला व्यावसायिकाला धमकावून ४५ लाखांची खंडणी प्रकरण

**पुणे :** महिला व्यावसायिकाला धमकावून ४५ लाखांची खंडणी उकळल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात गुंड नीलेश घायवळ याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. बनावट कागदपत्रांच्या आधारे पारपत्र मिळवून परदेशात गेलेला घायवळ याच्या विरुद्ध कोथरूड गोळीबार प्रकरणानंतर गंभीर स्वरूपाचे अकरा गुन्हे दाखल झाले आहेत. घायवळविरुद्ध आतापर्यंत वेगवेगळ्या तीन गुन्ह्यात मकोका कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

'कोथरूड गोळीबार, बांधकाम व्यावसायिकाला धमकावून सदनिकांचा ताबा घेणे, तसेच महिला व्यावसायिकाला खंडणी उकळल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात



पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केली आहे. आतापर्यंत घायवळविरुद्ध मकोका कायद्यान्वये तीन गुन्हे दाखल झाले आहेत', अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

घायवळच्या संपत्तीबाबत पुणे पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. घायवळच्या संपत्तीची चौकशी करण्याबाबत पुणे पोलिसांकडून अंमलबजावणी संचानालयाशी (ईडी) पत्रव्यवहार करण्यात आला आहे. घायवळ सध्या लंडनमध्ये वास्तव्यास आहे. बनावट कागदपत्रांद्वारे पारपत्र मिळवून तो परदेशात गेल्याचे तपासात उघडकीस आले आहे. घायवळच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांनी ब्रिटनमधील उच्चायुक्तांशी पत्रव्यवहार केला आहे.

घायवळचा भाऊ सचिन याच्याविरुद्ध 'मकोका' कारवाई करण्यात आली आहे. कोथरूड भागात नव्याने बांधण्यात आलेल्या एका इमारतीतील दहा सदनिका जबरदस्तीने बळकावल्याप्रकरणी सचिन, नीलेश घायवळ याच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते. शाळेतील उपाहारगृहासाठी खाद्यपदार्थ पुरविणाऱ्या एका महिलेला धमकावून तिच्याकडून खंडणी उकळल्याप्रकरणी घायवळ याच्यासह त्याच्या भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. घायवळ सध्या लंडनमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याचा मुलगा लंडनमध्ये शिक्षण घेत आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांकडून पत्रव्यहार करण्यात आला आहे. याबाबत आंतराष्ट्रीय पोलीस संघटनेशी (इंटरपोल) संपर्क साधण्यात आला आहे. घायवळला ताब्यात घेण्यासाठी ब्लू कॉर्नर नोटीस बजाविण्यात आली आहे घायवळने अहिल्यानगर ग्रामीण पोलीस दलातील अहमदनगर विभागातून बनावट कागदपत्रे सादर केली. 'घायवळ' ऐवजी 'गायवळ' नावाने बनावट कागदपत्रे सादर करून २०१९ मध्ये घायवळने पारपत्र मिळवले. अहमदपूर पोलिसांनी पारपत्र पडताळणी (पासपोर्ट व्हेरिफिकेशन) केली होती.

# विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे : डॉ. माळवदे

## एमआयटी एडीटी आणि ॲडमिशन सजेशन कार्यक्रम

**पिंपरी चिंचवड :** "विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करून अभ्यास केला तर चांगले गुण मिळवणे सहज शक्य आहे. आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करून नावलौकिक मिळवा आणि सातत्याने रिव्हिजन करण्याची सवय लावा," असे एमआयटी एडीटी विद्यापीठाचे विद्यार्थी कार्य विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. उल्हास माळवदे यांनी सांगितले.

निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहामध्ये एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे आणि ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'बारावी नंतर पुढे काय?' या विषयावर मोफत करिअर गायडन्स सेमिनाराचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी पिंपरी चिंचवड शहरातील प्रा. विजय





बोबडे, फुंदे मॅडम, सावंत डी.जे., वाळुंज सर, सचिन निंजवते, घोंगडे सर आणि नितेश शिरसाठ यांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी सहाय्यक प्राध्यापक डॉ. नंदकिशोर कार्लेकर आणि ॲडमिशन सजेशनचे संचालक अक्षयकुमार भंडारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. कार्लेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांना नवतंत्रज्ञानाशी जोडलेले करिअर निवडण्याचे आवाहन केले. "तुमची आवड ओळखा आणि त्याच दिशेने स्पेशलायझेशन करा. तंत्रज्ञान सतत बदलत असते, म्हणून शिकत राहणे आणि भविष्योन्मुख दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. अक्षयकुमार भंडारी यांनी CET आणि JEE अभ्यासक्रम, तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करताना सांगितले, "कौन्सिलिंग म्हणजे फक्त फॉर्म फिलिंग नव्हे, तर योग्य माहितीवर आधारित निर्णय घेणे हेच खरे करिअर मार्गदर्शन आहे, असा कानमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला." सोमराज नाडे यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय भंडारी यांनी आभार मानले. आकाश भंडारी व संदेश भंडारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

# दौंडमधील रेशन दुकानातील हप्तेखोरी बंद करण्यासाठी आंदोलन करणार : कदम

## तालुक्यातील पुरवठा शाखेतील अधिकारी फक्त आठवड्यातून दोन दिवस हजर

**दौंड :** दौंड तालुक्यात रेशन दुकानदार आणि नागरिकांची लूट?; 'हप्तेखोरी बंद नाही केली तर आंदोलन' – मराठा संघर्ष योद्धा राजाभाऊ कदमांचा इशारा दौंड (प्रतिनिधी) : दौंड तालुक्यातील पुरवठा शाखेत सध्या खुलेआम लूटमार सुरू असल्याचा गंभीर आरोप मराठा संघर्ष योद्धा संघटनेचे प्रमुख राजाभाऊ कदम यांनी केला आहे. रेशन दुकानदार आणि गरीब नागरिकांवर दिवसाढवळ्या अन्याय होत असून, उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या हप्तेखोरीमुळे तालुक्यातील १५२ रेशन दुकानदार आणि हजारो रेशन कार्डधारक त्रस्त असल्याचा दावा त्यांनी केला. या भ्रष्टाचारावर कारवाई न झाल्यास तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा कदम यांनी दिला आहे.



राजाभाऊ कदम म्हणाले की, "दौंड तालुक्यातील पुरवठा शाखेतील संबंधित अधिकारी फक्त आठवड्यातून दोनच दिवस कार्यालयात उपस्थित असतो, मात्र त्या दोन दिवसांतच तो रेशन दुकानदारांकडून दर महिन्याला प्रत्येकी १५० रुपये हप्ते वसूल करतो. ही रक्कम तो काही झिरो कर्मचाऱ्यांमार्फत स्वतःकडे गोळा करतो. एवढंच नव्हे, तर रेशन कार्डावर नावे समाविष्ट करणे, विभक्त कार्ड मिळवणे, नाव वगळणे अशा नियमित कामांसाठी ५०० ते १५०० रुपयांची लाच घेतली जाते." कदम यांनी पुढे सांगितले की, "ही प्रथा आता नियमित झाली असून, अधिकाऱ्यांचे काही खास कर्मचारी एजंटसारखे काम करत आहेत. काही धनिकांची नावे योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी हेच कर्मचारी दलाली करतात. गरीब आणि पात्र नागरिकांना मात्र फक्त त्रास दिला जातो. अनेक रेशन दुकानदार आणि नागरिकांनी या हप्तेखोरीविरोधात तक्रार करण्याचाही प्रयत्न केला, पण कारवाईच्या नावाखाली सर्व प्रकरणे दडपली गेली."

# पिंपरी चिंचवड जागतिक दर्जाच्या स्मार्टसिटीमध्ये झळकले

**पिंपरी :** "जागतिक चर्चांमधून शहरात नवीन संकल्पना व उपाययोजना लागू करण्याची प्रेरणा मिळाली." या सहभागामुळे पिंपरी चिंचवड शहर जागतिक दर्जाच्या शाश्वत आणि स्मार्ट शहरांच्या यादीत स्वतःची ओळख अधिक दृढ करत आहे, असे सहशहर अभियंते बापू गायकवाड यांनी सांगितले

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्पेनमधील बार्सिलोना येथे ४ ते ६ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड काँग्रेस २०२५' मध्ये सहभाग घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख दृढ केली. भारतातील सहा पायलट शहरांपैकी एक म्हणून महानगरपालिकेला 'आंतरराष्ट्रीय शहरी आणि प्रादेशिक सहकार्य ग्लोबल थीमॅटिक नेटवर्किंग कार्यशाळा' मध्ये आमंत्रित करण्यात आले. या कार्यशाळेत मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि सहशहर अभियंता बापू गायकवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. शहरी गतिशीलता, हवामान बदलास अनुरूप नियोजन आणि शाश्वत वाहतूक यांसारख्या विषयांवर त्यांनी जगभरातील शहर प्रतिनिधींशी अनुभवांची देवाणघेवाण केली. ल्यूवेन, हॅम्बुर्ग आणि व्हिक्टोरिया यांसारख्या शहरांसोबत 'वेस्ट-टू-एनर्जी', 'हरित वाहतूक प्रणाली' आणि 'स्मार्ट शहरी उपाय' यावर सखोल चर्चा झाली.

महानगरपालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाय राबवत आहे. आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितले, "बार्सिलोना येथील सहभाग आपल्या शहराच्या शाश्वत आणि नागरिकाभिमुख विकास दृष्टिकोनाची जागतिक पातळीवरील दखल आहे."

# नारायणगाव-जुन्नरमधील घरफोड्या करणारा फरार जेरबंद

## १४ लाखांचा मुद्देमाल जप्त : विशाल तांदळेवर २८ गुन्ह्यांची नोंद

**नारायणगाव :** नारायणगाव आणि जुन्नर परिसरात घरफोड्या करून फरार आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. विशाल दत्तात्रय तांदळे (वय २८, रा. मंचर, आंबेगाव, पुणे; मूळ रा. पाटेगाव, कर्जत, अहिल्यनगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. आरोपीकडून १६ तोळे सोनं, ८४१ ग्रॅम चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि मोटर सायकल असा एकूण ₹१४,३७,६५० किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपीकडे तपास केला असता त्याच्यावर नारायणगाव पोलीस स्टेशन आणि जुन्नर पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद असल्याचे उघडकीस आले. फिर्यादी विष्णू भागूजी (वय ६२, रा. वैभवलक्ष्मी सोसायटी, नारायणगाव) यांनी दिवाळी निमित्ताने बँकेतून आणून दागिने घरात ठेवले




होते. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे चारच्या सुमारास घरफोडी झाली, ज्यात ११ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलीसांचे संयुक्त पथकाने आरोपी पकडून तपास केला. त्यावेळी आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक: प्रविण सपांगे, महादेव शेलार, पोलीस अंमलदार दिपक साबळे, राजू मोमीन, संदिप वारे, अक्षय नवले, मंगेश लोखंडे, सत्यम केळकर, सोमनाथ डोके, निलेश जाधव पोलीस उपनिरीक्षक सोमेशेखर शेटे यांच्या पथकाने ही दमदार कामगिरी केली.

# मामा-भाचेंनी दिलेली 'टाळी' वाजणार की 'टाळीच' राहणार?

## मावळात महायुतीचा फॉर्म्युला ठरला — लोणावळा राष्ट्रवादीकडे, तळेगाव भाजपकडे; स्थानिक समीकरणांना नवं वळण!

**तळेगाव दाभाडे :** मावळ तालुक्यातील नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अखेर महायुतीने आपला "मावळ फॉर्म्युला" निश्चित केला आहे. मुंबईत पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत ठरलं की लोणावळा नगरपरिषद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडे राहणार, तर तळेगाव दाभाडे नगरपरिषद भारतीय जनता पक्षाकडे सोपविण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, तसेच चंद्रकांत शेटे, गणेश भेगडे, इंदर ओसवाल आणि



संदीप गराडे उपस्थित होते. या निर्णयामुळे मावळातील राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली आहे. महायुतीतील "मामा-भाचेंची टाळी" (अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची राजकीय मैत्री) आता प्रत्यक्षात कितपत घुमते हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. "मावळ फॉर्म्युला" ठरला आहे.

राज्यातील महायुती नेत्यांनी मावळ तालुक्याला विशेष महत्त्व दिलं असून, युतीतील अंतर्गत मतभेद मिटवून निवडणुकीसाठी एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीत मावळातील दोन प्रमुख नगरपरिषदांच्या अध्यक्षपदाची विभागणी ठरविण्यात आली.

लोणावळा नगरपरिषद: राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)कडे तळेगाव दाभाडे नगरपरिषद: भारतीय जनता पक्षाकडे लोणावळा नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीकडून राजेंद्र बबनराव सोनवणे यांची उमेदवारी दोन दिवसांपूर्वीच जाहीर करण्यात आली आहे.

तळेगाव नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी भाजपकडून संतोष हरिभाऊ दाभाडे पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शेळके-भेगडे यांची निर्णायक बैठक मावळातील राजकारणात एकमेकांचे राजकीय प्रतिस्पर्धी मानले जाणारे आमदार सुनील शेळके आणि माजी मंत्री बाळा भेगडे हे दोघेही मुंबईतील बैठकीत एकाच टेबलावर बसले. त्यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत "मावळ फॉर्म्युला" ठरल्याने स्थानिक राजकारणात नवा अध्याय सुरू झाल्याचे मानले जात आहे. या दोन्ही नेत्यांनी आपल्या पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करून, आगामी निवडणुकीत महायुती एकत्र राहील, असा विश्वास व्यक्त केला. मात्र स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये या कराराविषयी मिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

"टाळी" घुमेल की नाही? — लोणावळा भाजपचा युतीला नकार मुंबईतील निर्णयानंतर लोणावळ्यात भाजपच्या कोअर कमिटीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी माजी मंत्री बाळा भेगडे यांनी या बैठकीत स्थानिक कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. या बैठकीत अनेक पदाधिकारी आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीसोबत युती करण्यास नकार दिला. त्यांच्या मते, "लोणावळा नगरपरिषदेत राष्ट्रवादीची ताकद वाढविण्यापेक्षा स्वतंत्र लढा दिल्यास भाजपला चांगले यश मिळू शकते." त्यामुळे "लोणावळा राष्ट्रवादीकडे आणि तळेगाव भाजपकडे" हा फॉर्म्युला कागदावरच राहणार की प्रत्यक्षात राबविला जाणार — याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

स्थानिक सूत्रांच्या मते, या असंतोषामुळे लोणावळा परिसरातील महायुतीचे गणित पुन्हा गुंतागुंतीचे होऊ शकते.

### तळेगावमध्ये भाजपची ताकद

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी मात्र भाजप एकवटली असल्याचे दिसते. आमदार सुनील शेळके यांनी आरक्षणानंतरच संतोष हरिभाऊ दाभाडे पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा केली होती. "मावळ पॅटर्न" राज्यातही लागू होऊ शकतो. मावळमध्ये ठरलेला हा "युती फॉर्म्युला" राज्यभरातील इतर नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी आदर्श पॅटर्न ठरू शकतो, अशी चर्चा सुरू आहे. सूत्रांच्या मते, फडणवीस-अजित पवार यांच्या सहकार्याने राज्यातील विविध ठिकाणी भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्यात विभागणी ठरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## सारांश वृत्त

### भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांना अभिवादन

**पिंपरी :** भारताचे माजी (पहिले) केंद्रीय शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी महापालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्तेभारतरत्न, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी उपायुक्त अण्णा बोदडे, नगररचना विभागाचे सह संचालक प्रशांत शिंपी,विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते अझिज शेख,अझहर खान,रफीक कुरेशी, हाजी याकुब,आयान शेख, ॲड गणेश मसलेकर, जावेद शहा,रोहन रोकडे, समरीन कुरेशी उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या की, मौलाना अबुल कलाम आझाद यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.त्यांनी त्यांच्या जीवनात शिक्षण, विज्ञान आणि राष्ट्रीय एकता यांना महत्त्व दिले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे ही मौलाना आझाद यांची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांच्या व्यापक विचारांतून शिक्षण क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले.

### कामाचा मोबदला मागितल्याने युवकाला मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा

**शिरूर :** सणसवाडी (ता. शिरूर) येथे भागीदारीत गुंतवलेले पैसे आणि कामाचा मोबदला मागितल्याच्या कारणावरून एका युवकाला मारहाण करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषिकेश धुमाळ, राजू चव्हाण अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी सुरेश दशरथ चव्हाण (वय २९, रा. सणसवाडी, मूळ रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी सांगितले की, सणसवाडी येथे 'युनिटेक इंडस्ट्रीज' नावाने एक शॉप सुरु करण्यात आले होते. या शॉपमध्ये ऋषिकेश धुमाळ, राजू चव्हाण आणि सुरेश चव्हाण यांनी भागीदारीत गुंतवणूक केली होती. काही दिवसांपूर्वी अंतर्गत वाद निर्माण झाल्यानंतर सुरेश चव्हाण यांनी आपले चाळीस हजार रुपये गुंतवणुकीचे पैसे आणि कामाचा मोबदला मागितला. त्यावरून ऋषिकेश धुमाळ, राजू चव्हाण आणि त्यांच्या एका साथीदाराने सुरेश चव्हाण यांना शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली.

### लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन तरुणीवर बलात्कार करणारा जेरबंद

**पुणे:** कोंढव्यातील अल्पवयीन तरुणीवर लग्नाच्या आमिषाने बलात्कार करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली. अनिकेत राकेश निकाळजे (वय २१, रा. एसआरए वसाहत, कमेला, कोंढवा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की,पीडित अल्पवयीन युवतीची आणि आरोपी अनिकेत निकाळजे याची काही महिन्यांपूर्वी ओळख झाली होती. सुरुवातीला मैत्री आणि नंतर या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. आरोपी अनिकेत निकाळजे याने पीडित तरुणीला विवाहाचे अमिष दाखवून वेळोवेळी लैंगिक अत्याचार केले.

# "छुपी युती नाही, 'पुणेकरांना स्पष्ट उत्तर!'

## प्रशांत जगताप : राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) गटाचा महायुतीला ठाम नकार"

**पुणे : राज्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन गट एकत्र येणार का, या चर्चेला अखेर पुण्यातून स्पष्ट उत्तर मिळालं आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) पक्षाने महायुतीसोबत कोणतीही छुपी युती होणार नाही, असा ठाम निर्वाळा देत आपली राजकीय रेषा स्पष्ट केली आहे. "आमची लढाई महायुतीविरोधात होती, आहे आणि राहील," अशी भूमिका शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी घेतली.**



जगताप म्हणाले, "महायुतीच्या काळात पुण्याचं नुकसान झालं. शहराची विकासयात्रा थांबली. आम्ही गेल्या वेळी महायुतीविरोधात लढलो आणि तीच भूमिका कायम ठेवणार आहोत. कोणत्याही महायुती पक्षासोबत आमची संगत नाही. अंतिम निर्णय पक्षाध्यक्ष शरद पवार घेतील." मनसेला सोबत घेण्याबाबत विचारलं असता, त्यांनी सांगितलं की "राज्य पातळीवरील तो निर्णय शरद पवारच घेतील." म्हणजेच नाशिकमध्ये सुरू झालेल्या महाविकास आघाडी–मनसे प्रयोगाबाबत पुण्यात अद्याप अधिकृत दिशा नाही, पण ती शक्यता खुली ठेवण्यात आली आहे. दोन्ही गटांत समन्वयाच्या चर्चेला उधाण गेल्या काही दिवसांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी राज्यभर राष्ट्रवादीच्या दोन गटांमध्ये गुप्त समन्वय होण्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. त्यात पवार गटातील अनेक इच्छुक संभ्रमात पडले होते. पक्षातच प्रश्नांची सरबत्ती सुरू असताना, पुणे शहराध्यक्षांनी दिलेलं हे वक्तव्य म्हणजे गोंधळावर टाकलेली स्पष्ट रेष मानली जाते. दरम्यान, पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी स्पष्ट केलं, "कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड वगळता राज्यात कुठेही दोन्ही राष्ट्रवादी पक्षांमध्ये युती झालेली नाही. पुण्यात तर अशा चर्चेलाच आमच्या कार्यकर्त्यांमध्ये वाव नाही." काकडे यांनी पुढे सांगितलं की, "प्रत्येक प्रभागात आम्ही सक्षम उमेदवार उभे करू, आणि लवकरच काही नवे चेहरे पक्षात दाखल होणार आहेत." या स्पष्ट भूमिकेमुळे पुण्यातील राजकीय वातावरणात नवचैतन्य आलं आहे. भाजपविरोधी पाटावर आपली निष्ठा दाखवत पवार गटाने दिलेला हा संदेश महाविकास आघाडीत नवा आत्मविश्वास निर्माण करणारा ठरत आहे. आता शहरात प्रश्न फक्त एकच — "पवार गटाची ही ठाम भूमिका पुण्यातील समीकरणं स्थिर ठेवेल का, की पुन्हा राजकीय थर्मामीटर उसळी मारेल?" असे त्यांनी सांगितले.

# कार्तिकी एकादशीनिमित्त ३६२ जादा पीएमपी बसेस धावणार

## आळंदी मार्गावर वाहतुकीला वेग!

**पुणे :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या कार्तिकी एकादशीनिमित्त भाविकांच्या गर्दीला सुसूत्र वाहतूक सुविधा देण्यासाठी पीएमपीएमएलने मोठं पाऊल उचललं आहे. दि. १३ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत ३६२ बसेस — त्यापैकी २२९ जादा बससेवा — पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए कार्यक्षेत्रात धावणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी श्री क्षेत्र आळंदी येथे दर्शनासाठी येतात. बुधवारपासून (दि. १२) यात्रेची सुरुवात होत असून, वाहतूक व गर्दीचे व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी पीएमपीएमएलकडून विशेष नियोजन आखण्यात आले आहे. आळंदी मार्गावर धावणाऱ्या नियमित १३३ बसेसबरोबरच २२९ जादा बस धावणार आहेत. याशिवाय दि. १५ ते १७ नोव्हेंबरदरम्यान रात्रीच्या वेळीही बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन आळंदी गावातील बसस्थानक स्थलांतरित करून काटेवस्ती येथे तात्पुरते बसस्थानक उभारण्यात आले आहे.



यात्रेच्या काळात काही मार्ग पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहेत. त्यामध्ये बसमार्ग क्रमांक २६४ (भोसरी–पाबळ), २५७ (आळंदी–मरकळ) आणि ३६४ (आळंदी–चाकण आंबेठाण चौक) हे मार्ग समाविष्ट आहेत. तसेच, रात्री १० नंतर सुरू होणाऱ्या जादा बससेवेसाठी सध्याच्या दरापेक्षा रुपये १० अतिरिक्त भाडे आकारले जाणार आहे. प्रवाशांसाठी दिलेल्या पासचा (एकदिवसीय, साप्ताहिक, मासिक, ज्येष्ठ नागरिक) वापर रात्री १० नंतरच्या जादा सेवेत करता येणार नाही, असे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

स्वारगेट, हडपसर, पुणे स्टेशन, म.न.पा. भवन, निगडी, पिंपरी-चिंचवड, देहूगाव, भोसरी आणि रहाटणी येथून या बसेस संचलित केल्या जाणार आहेत. या नियोजनामुळे यात्रेच्या काळात वाहतूक कोंडी टळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टाकळी हाजीमध्ये गायीच्या हंबरड्यामुळे महिलेवरील बिबट्याचा हल्ला टळला

## केसकर : नागरिकांचा सतर्क राहण्याचा इशारा

**टाकळी हाजी :** टाकळी हाजी (ता. शिरूर) गावडेमळा येथे गायीच्या मोठ्या हंबरड्यामुळे महिलेवरील बिबट्याचा हल्ला फसला. ही घटना सोमवारी (दि. १०) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली. रंजना म्हतू गावडे असे बिबट्याच्या हल्ल्यातून बचावलेल्या महिलेचे नाव आहे.

रंजना गावडे घरासमोर गाय बांधत होत्या. त्यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्या महिलेच्या दिशेने झेपावला. वाकलेल्या अवस्थेत असल्यामुळे बिबट्याला ती शिकार वाटली असावी. बिबट्याने झेप घेताच गायीने मोठ्याने हंबरडा फोडला. या आवाजाने गावडे यांनीही आरडाओरड केली. अचानक झालेल्या या गोंगाटामुळे बिबट्याने धूम ठोकली. मात्र, काही क्षणांनी बिबट्याने पुन्हा घरासमोर येऊन तारेच्या कंपाउंडमधून आत शिरण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे गावडे कुटुंबातील सदस्य भयभीत झाले होते. दरम्यान, रंजना गावडे यांचा रक्तदाब वाढल्याने वैद्यकीय उपचार सुरू आहेत. वन विभागाला नागरिकांनी माहिती दिली. वनरक्षक महेंद्र केसकर म्हणाले की, गावडेमळा व होनेवाडी परिसरात पिंजरे लावण्यात आले आहेत, तसेच बिबट्याचा शोध सुरू आहे. स्थानिकांनी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. वनविभागाने परिसरात सतत तैनाती ठेवून बिबट्याचा मनसैनिक पाळत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

# कर्णकर्कश हॉर्नमुळे दुचाकी घसरली, डंपरच्या चाकाखाली तरुणाचा मृत्यू

**पुणे :** विमाननगर परिसरात शनिवारी मध्यरात्री घडलेल्या भयानक अपघातात २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र स्वप्नील भानुदास माने जखमी झाला. डंपरचालकाचा कर्णकर्कश हॉर्न वाजविल्यामुळे दुचाकीवर नियंत्रण सुटले आणि भरधाव डंपरचे चाक सचिनच्या डोक्याने जाऊन त्याचा जीव गेला.

पोलिसांनी सांगितले की, सचिन वसंत धुमाळ (रा. मल्हारनगर, वडगाव शेरी) विमाननगर येथील नामांकित फायनान्स कंपनीत विक्री अधिकारी होता. अपघाताच्या वेळी तो आणि त्याचा सहकारी स्वप्नील माने दुचाकीवरून विमाननगर ते खराडी बायपासकडे जात होते. टाटा गार्डन चौकात पाठीमागील डंपरचालकाने जोरात हॉर्न वाजवल्याने दुचाकीवर नियंत्रण सुटले आणि दोघे रस्त्यावर पडले. स्वप्नील मानेने सचिनला उठविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो प्रतिसाद देत नव्हता. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन सचिनला रुग्णवाहिकेतून ससून रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी मृत्यू जाहीर केला. घटनास्थळी न थांबता डंपरचालक पसार झाला; सीसीटीव्ही चित्रीकरणाद्वारे त्याचा शोध घेतला जात आहे. सहायक निरीक्षक समीर करपे तपास करीत आहेत. या घटनेनुसार डंपरचालकाविरुद्ध निष्काळजीपणाने मृत्यूस कारणीभूत वाहन चालविणे आणि इतरांचे जीवित धोक्यात आणणे या भारतीय दंड संहितेतील कलमांसह मोटार वाहन कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पुणे-सोलापूर रस्त्यावर लोणी काळभोर येथे भरधाव वाहनाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. शिवाजी भानुदास वैरागे (वय ६२) असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव आहे. त्यांच्या मुलाने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मंगळूरमध्ये 'पट्टेरी वाघ'? एआय छायाचित्रामुळे फैलावलेले भीतीचे वातावरण

## परिसरात आधीच बिबट्यामुळे दहशत

**बनकरफाटा :** मंगळूर (ता. जुन्नर) गावात शनिवारी (दि. ८) सोशल मीडियावर 'पट्टेरी वाघाचे छायाचित्र' व्हायरल झाले. छायाचित्र पाहून नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. परिसरात आधीच बिबट्यामुळे दहशत पसरली आहे. स्थानिक रहिवासी नितीन लक्ष्मण मिंडे यांनी सांगितले की, त्यांच्या मुलाला वाघ दिसल्याचे त्यांनी पाहिले व त्याचे छायाचित्र काढले. जुन्नर वनविभागाला ही माहिती मिळताच ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे घटनास्थळी गेले आणि छायाचित्राची चौकशी केली. यावेळी सत्य परिस्थिती समोर आली की, नागरिकांनी दिलेल्या छायाचित्रात दिसणारा वाघ खरा नसून, तो एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाने तयार केलेला होता. वनविभागाने ही माहिती मिळताच संबंधित व्यक्तींना नोटीस जारी केली. छायाचित्रांची सत्यता तपासल्याशिवाय शेअर करू नका, असे आवाहन केले आहे.

**"ऑन दि स्पॉट शूट" करा:**

वनमंत्री गणेश नाईक यांनी पिंपरखेड येथील बिबट हल्ल्यात बळी घेतलेल्या बोंबे कुटूंबाची भेट घेतली. बळी गेलेल्या घरातील एका व्यक्तीला वनविभागात नोकरी देण्याचा विचाराधीन आहे. अशा घटना पुन्हा घडायला नको म्हणून बिबट्या दिसताच क्षणी ऑन स्पॉट शूट करा, असे त्यांनी सांगितले.

# "सेनेचे हात आरोग्यसेवेसाठी — पेठ शाळेत विद्यार्थ्यांची तपासणी, सृजनशीलतेला झळाळी"

**लोणी काळभोर :** राष्ट्ररक्षणाची शपथ घेतलेले हात जेव्हा गावाच्या मुलांच्या आरोग्यसेवेसाठी पुढे येतात, तेव्हा खरी सेवा-अभियानाची भावना उमटते. वानवडी (पुणे) येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या नर्सिंग विद्यार्थ्यांनी पेठ (ता. हवेली) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये हाच संस्कार उजळवला. सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून सेवेचा एक नवा आदर्श घालून दिला.



आरोग्य तपासणीसोबतच शाळेत सृजनशीलतेचा उत्सव रंगला. पोस्टर, चित्रकला, घोषवाक्य लेखन, कविता पाठांतर आणि "हम सब एक हैं" या सामाजिक नाट्यप्रयोगांनी बालमनातील विचारांना दिशा मिळाली. स्पर्धेत विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजच्या वतीने बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमाला कर्नल सोनिया सकलानी, मेजर आर्या अरविंद यांची उपस्थिती लाभली. ग्रामपातळीवरील लोकप्रतिनिधी व समाजसेवक — सरपंच काळूराम चौधरी, उपसरपंच शोभा नामदेव चौधरी, माजी सरपंच तानाजी चौधरी, विजया शरद चौधरी, मोनिका श्रीकांत चौधरी, पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी, उद्योजक निलेश चौधरी, राहुल चौधरी, तयाजी नाना चौधरी, चेअरमन सोमनाथ चौधरी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश गायकवाड, प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी डॉ. सुखदा कदम, ग्रामसेवक नंदकुमार चव्हाण, मुख्याध्यापक लक्ष्मण सूर्यवंशी, शिक्षकवर्ग व पालक उपस्थित होते.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक राजेंद्र कुंभारकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन साकोरकर यांनी मानले.

पेठच्या शाळेतील हा उपक्रम म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवा या तिन्हींचा संगम — "हम सब एक हैं" हे केवळ नाटकाचे नाव नव्हते, तर त्या दिवसाचा जिवंत संदेश होता.

# मानवतावादी समाजसेवी संघटनेचा नवा ध्यास!

## अशोक जाधव : पुण्यात सामाजिक क्रांतीची सुरुवात

**पुणे :** शिक्षण क्षेत्रातील अनुभवी आणि सेवानिवृत्त शिक्षकांनी समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी मानवतावादी समाजसेवा संघटना स्थापन केली आहे. संघटनेच्या माध्यमातून शाळेतून दूर गेलेल्या मुलांना शिकण्याची संधी, अतिवृष्टीधारकांसाठी अन्न, पाणी व मदत, तसेच मुलींसाठी दत्तक योजना राबवली जात आहे, असे संस्थेचे संस्थापक आणि सचिव अशोक जाधव यांनी सांगितले.



जाधव म्हणाले, "शिक्षक म्हणून जे ज्ञान आम्ही विद्यार्थ्यांना दिले, त्याचा लाभ समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचवणे आमचे कर्तव्य आहे." संघटनेने विशेष शिकवणी वर्ग, मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य आयोजित केले आहे, ज्यामुळे शाळेतून दूर गेलेले विद्यार्थी पुन्हा शिक्षणात जोडले जात आहेत. "हे उपक्रम तात्पुरते नाहीत; समाजासाठी दीर्घकालीन बदल घडविण्यासाठी नियोजित आहेत. आमच्या प्रयत्नांनी भविष्य पिढीचे भविष्य उज्वल होईल." २०२४ या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्यांना मानवतावादी शौर्य पुरस्कार कै. दामोदर नारायण जाधव यांचे नावाने सुरु करण्यात आला. अतिवृष्टीधारकांसाठी अन्नधान्य, पिण्याचे पाणी आणि प्राथमिक सुविधा पुरवण्याचा उपक्रम सुरू असून, मुलींसाठीच्या दत्तक योजनेत सुरक्षित वातावरण, शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत, असे जाधव यांनी स्पष्ट केले. संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश रावळकर, कार्याध्यक्ष श्रीनिवास नंबियार आणि विश्वस्त मंडळातील सदस्य पदमाकर बांडे, मेहमूदशा भंडारी, अनिल वाघमारे, माधुरी घाटपांडे, तसेच खजिनदार बाळासाहेब बारवकर उपस्थित होते.

बारवकर म्हणाले, "स्थानिक प्रशासन, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने हा उपक्रम समाजात आदर्श रूपात राबवला जात असून, इतर समाजसेवी संस्थांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहे." या उपक्रमांमुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना केवळ जीवनावश्यक मदत मिळत नाही, तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो, संधी मिळतात आणि दीर्घकालीन विकास घडतो, असे त्यांनी सांगितले.

# शेलारपट्टा येथे मोफत हरभरा बियाणे वाटप

## शेतकऱ्यांना 'एआय' ॲपचा नवा मार्गदर्शक हात

**इंदापूर :** पळसदेव येथील शेलारपट्टा (ता. इंदापूर) येथे कृषी विभागाच्या वतीने शेतकरी बचत गटांना मोफत हरभरा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी हरभरा पिकाबाबत मार्गदर्शन करून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे महत्त्व मंडळ कृषी अधिकारी किरण पिसाळ यांनी सांगितले. दीपक गरगडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात हरभरा शेती कार्यशाळा घेण्यात आली. मंडळ कृषी अधिकारी किरण पिसाळ, उप कृषी अधिकारी गोपाळ खंडागळे, सहायक कृषी अधिकारी गणपत खांडेकर, प्रशांत मोहोळकर, योगेश बोगाने यांच्यासह शेतकरी बबन बनसुडे, सोमनाथ शिंदे, रमेश पवार, दीपक शेलार, सतीश शिंदे, अमर इंजे, विकास जावळे, संपत गांधले, प्रमोद शेलार, हनुमंत जावळे, नवनाथ इंजे, महेंद्र घाडगे व रविराज देटे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहायक कृषी अधिकारी गणपत खांडेकर यांनी शेतकरी नोंदणी, ओळख प्रक्रिया तसेच 'महाविस्तार एआय ॲप' चा वापर याबाबत प्रात्यक्षिक दाखवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



# पुणे महापालिकेचा दोन कोटींचा अपव्यय

## गणवेश-साड्या, इकोचिप पावडर गोदामात पडून

**पुणे :** मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी पुणे महापालिकेच्या भांडार विभागावर थेट आरोप केला आहे की, विभागाची अकार्यक्षमता आणि ढीगपणा महापालिकेला दोन कोटी रुपयांचे नुकसान करून देत आहे. संभूस यांनी तक्रार केली की, नऊ वर्षांपूर्वी कर्मचाऱ्यांसाठी खरेदी केलेले गणवेशाचे कापड व साड्या आजही गोदामात धुळ झेरत आहेत, तर दोन वर्षांपूर्वी घनकचरा विभागासाठी खरेदी केलेली इकोचिप पावडर आणि बायोकॅटॅलिस्ट लिक्विड वापरात आलेली नाही.

संभूस यांनी सांगितले की, भांडार विभागाने २०१५ मध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी ७५ लाख रुपये कापड आणि ६९.७१ लाख रुपये साड्या खरेदी केल्या. पैसे ठेकेदारांना दिले गेले, परंतु गेल्या नऊ वर्षांत एकही वस्त्र कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. गोदामात पडलेली ही साहित्य वडगाव बुद्रुक येथील सावित्रीबाई फुले अभ्यासिकेत धुळीला झाकलेली आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये घनकचरा विभागासाठी ५० लाख रुपये खर्च करून २० हजार किलो सिटी वेस्ट ट्रीटमेंट पावडर आणि ४ हजार लिटर बायोकॅटॅलिस्ट लिक्विड खरेदी केली. वापरात न आल्यामुळे रासायनिक घटक कमी झाले, आणि त्याचा उपयोग पूर्णपणे शून्य झाला. भांडार, घनकचरा आणि लेखा विभागांनी केवळ ठेकेदारांची बिले काढण्यात धन्यता मानली, परंतु साहित्याचा प्रत्यक्ष वापर किंवा वाटप करण्यात कुणाचाही लक्ष नाही. या दोन्ही खरेदींची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, आणि महापालिकेचा नुकसान वसूल करून नागरिकांचा पैसा वाचवावा. अधिकारी म्हणतात चौकशी करून कारवाई केली जाईल. मग आतापर्यंत कोणी अडवले होते का, असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

याप्रकरणी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी तीन सदस्यीय समिती ने चौकशीचे आदेश दिले आहेत. महापालिकेतील प्रशासनातील अकार्यक्षमता, विभागीय समन्वयाचा अभाव आणि जबाबदारीपासून सुटकेचा कल पुन्हा एकदा सार्वजनिकपणे उघड झाला आहे.

आयुक्त नवलकिशोर राम म्हणाले की, चौकशी पूर्ण झाल्यानंतर कायदेशीर कारवाई करून नुकसान वसूल केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

# माफ करा पाव्हणं... पण तुमच्या गावात मुलगी नाही देऊ शकत!

## पुणे जिल्ह्यात बिबट्याच्या दहशतीचे सामाजिक परिणाम; तरुणांच्या विवाहाला मोठं संकट

**पुणे : पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सध्या बिबट्याच्या दहशतीने अक्षरशः थैमान घातले आहे. अनेक ठिकाणी बिबट्याचे दिवसाढवळ्या दर्शन होत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र ही दहशत आता फक्त जीवघेणी राहिलेली नाही, तर तिने सामाजिक आयुष्यालाही ग्रासले आहे. बिबट्याच्या भीतीमुळे या भागात लग्नासाठी मुलींना नकार मिळू लागला असून अनेक सुशिक्षित तरुणांचे संसाराचे स्वप्न अधांतरी लटकले आहे.**



शिरूर, आंबेगाव, जुन्नर आणि खेड या तालुक्यांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांच्या हालचालींनी गावकऱ्यांचा जीव मुठीत धरला आहे. काही ठिकाणी गुरांवर हल्ले होत आहेत, तर काही ठिकाणी शेतात काम करणाऱ्या लोकांवरही बिबट्याने झडप घातल्याच्या घटना घडल्या आहेत. बिबट्याच्या दहशतीचा सर्वात मोठा सामाजिक परिणाम विवाहसंस्थेवर होताना दिसतोय. उत्तर पुणे जिल्ह्यातील काही गावांतील तरुणांचे लग्न केवळ या कारणामुळे रखडले आहे. मुलं शिक्षित, नोकरीत स्थिर असली तरी त्यांच्या गावात बिबट्याचा वावर असल्याने मुलींचे पालक या भागातील सोयरीक जुळवण्यास स्पष्ट नकार देतात. "माफ करा पाव्हणं, पण तुमच्या गावात मुलगी नाही देऊ शकत," असा संवाद आता अनेक घरांमध्ये घडताना दिसतो.

शिरूर तालुक्यातील एका गावातील तरुण सांगतो, "मी बी.ई. केलंय, पुण्यात नोकरी करतो. पण आमच्या गावात बिबट्याचा वावर असल्याने दोन वेळा मुलीच्या घरी सोयरीक बोलणी झाली आणि दोन्ही ठिकाणी नकार मिळाला. पालक म्हणाले – तुमच्या गावात रात्री बाहेर पडायलाही भीती वाटते, मुलगी कशी राहील?" अशाच कथा आता आंबेगाव, जुन्नर, खेड परिसरातही ऐकू येत आहेत. काही तरुणांचे लग्न ठरून नंतर मोडले, तर काहींच्या सोयरीकाच पुढे सरकत नाहीत. त्यामुळे या भागात बिबट्याच्या दहशतीने केवळ जीवसृष्टीच नव्हे तर सामाजिक आयुष्यालाही झपाटले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संध्याकाळी सहानंतर गावात कोणी बाहेर पडत नाही. मुलांना शाळेत नेणं-आणणं ही पालकांसाठी धोक्याची बाब ठरली आहे. शेतकरी शेतात काम करताना टोळीने जातात, तर महिलांना विहिरीवर पाणी भरण्याची वेळ आली की भीतीने अंगावर शहारे येतात.

वनविभागाकडून काही ठिकाणी पिंजरे लावण्यात आले आहेत, मात्र अद्याप बिबट्यांना पकडण्यात विशेष यश आलेले नाही. ग्रामस्थांचा आरोप आहे की, बिबट्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना होत नाहीत. "आम्ही फक्त बिबट्याला नव्हे, तर या भीतीमुळे उद्ध्वस्त होत असलेल्या आमच्या सामाजिक जीवनालाही वाचवण्याची मागणी करतो," असे एका ग्रामस्थाने सांगितले. बिबट्याच्या दहशतीमुळे लग्नासारख्या पवित्र संस्थेवर परिणाम होणे ही ग्रामीण समाजातील नवी आणि चिंताजनक बाब ठरत आहे. मुलींना सुरक्षित वातावरण न मिळाल्याने पालक घाबरत आहेत. परिणामी, अनेक तरुणांचे संसाराचे स्वप्न धुळीस मिळत आहे.

### ग्रामस्थांना आता एकच अपेक्षा

ग्रामस्थांना आता एकच अपेक्षा आहे — "बिबट्याचा बंदोबस्त व्हावा, म्हणजे आमच्या मुलांचं आयुष्य आणि आमचं समाजजीवन पुन्हा सामान्य व्हावं." बिबट्याच्या भीतीने हादरलेल्या या गावांमध्ये जीविताचे आणि सामाजिक अस्तित्वाचे रक्षण हेच आता सर्वात मोठं आव्हान बनलं आहे.

## थोडक्यात

### दहशतवादी कृत्याशी संबंध नाही : कुटुंबीय

श्रीनगर : दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनजवळ स्फोट प्रकरणातील संशयित डॉ. उमर नबी याचा दहशतवादी कारवायांशी काहीही संबंध असू शकत नाही, असा दावा त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. या स्फोटात वापरलेली मोटार ही डॉ. उमर नबी चालवत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून तो पुलवामातील कोइल गावचा रहिवासी आहे.

---

### भरधाव कंटेनरच्या धडकेत ८ वारकरी जखमी

पिंपरी-चिंचवड : कार्तिकी एकादशी वारीहून परत निघालेल्या वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव कंटेनर शिरल्याने महिला वारकऱ्याचा मृत्यू झाला असून, आठ जण जखमी झाले आहेत. ही घटना मंगळवारी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास घडली. कामशेत घाटात पहाटे भरधाव कंटेनर वारकऱ्यांच्या दिंडीत शिरला. कंटेनरने वारकऱ्यांना धडक दिली.

---

### बीडमध्ये नेत्यांचे पक्षांतराचे सोहळे

संभाजीनगर: बीड जिल्ह्यात नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराला वेग आला असून, भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मंगळवारी मुंबईत प्रवेश केला. कुंडलिक खांडे यांनीही मंगळवारीच पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधले. क्षीरसागर घराण्यातील तरूण नेते हेमंत क्षीरसागर हेही सत्ताधारीपैकी एका प्रमुख पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.

### पाच विमानतळांवर हाय अलर्ट

**मुंबई :** मुंबईहून वाराणसीकडे जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेस विमानाला हवेत असताना बॉम्बने उडवण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाली. त्यामुळे विमानाची तातडीने इमर्जन्सी लँडिंग करण्यात आली असून सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. दरम्यान, या ई-मेलमध्ये देशातील मुंबई, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद आणि तिरुअनंतपुरम या पाच विमानतळांना उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणा अलर्टवर असून बॉम्ब शोधक पथकाकडून तपास सुरू आहे.

---

### पाकिस्तानी पत्रकार ताहा सिद्दीकी यांचा दावा काय?

# स्फोटामागे पाक लष्कराचा हात!

## उमर नावाचा दहशतवादी कार चालवत असल्याची माहिती

**मुंबई : दिल्लीतल्या लाल किल्ला भागात आय-२० कारचा स्फोट झाल्याने १३ जणांचा मृत्यू झाला आहे तर २२ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दरम्यान या घटनेमागे काय काय पैलू आहेत याचा शोध घेतला जातो आहे. ज्यानंतर आता कार स्फोटाचं पुलवामा कनेक्शन समोर आलं आहे. पुलवामा येथील एका रहिवाशाने २९ ऑक्टोबरला ही आय २० कार खरेदी केली होती. दरम्यान या घटनेमागे आणि पाकिस्तानातील स्फोटामागे पाकिस्तानी लष्कराचा हात आहे असा दावा पाकिस्तानी पत्रकार ताहा सिद्दीकी यांनी केला आहे.**



पोलीस तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार,ह्युंदाई कंपनीची I-20 कार या स्फोटांसाठी वापरली गेली. तर या कारचा मूळ मालक दिल्लीतला मोहम्मद सलमान हा आहे. सलमाननं आपली कार ओखला भागातील नदीमला विकली. त्यानंतर नदीमने I-20 कार 'रॉयल कार झोन' या डीलरला विकली. दरम्यान या कारच्या खरेदी-विक्रीत बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला होता असे सांगितले जात आहे. दरम्यान पाकिस्तानच्या पत्रकार ताहा सिद्दीकी यांनी या घटनेबाबत धक्कादायक दावा केला आहे.

दिल्लीत झालेल्या कार स्फोटामागे आणि इस्लामाबादमध्ये झालेल्या स्फोटामागे पाकिस्तानी लष्कराचा हात आहे. दोन्ही स्फोटांमध्ये सुसाईड बॉम्बर्सचा वापर झाला. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख दहशतवादाचा वापर हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून वापरत आहेत. त्यामुळे दक्षिण आशियात शांतता नाही तर अशांतता आहे अशी पोस्ट ताहा सिद्दीकी यांनी लिहिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही कार पहिल्यांदा अल फलाह विद्यापीठाजवळ आढळून आली. रविवारी रात्री दोनच्या सुमारास ही कार या ठिकाणी आढळून आली. त्यानंतर सकाळी ७.३० च्या सुमारास फरिदाबाद येथील एशियन रुग्णालयाजवळ आढळून आली. त्यानंतर बद्रापूर या ठिकाणी असलेल्या टोल नाक्यावरुन सकाळी ८ वाजून ३ मिनिटांनी पुढे गेल्याचं सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतं आहे.उमर नावाचा दहशतवादी व्हाईट कॉलर मोड्युलसाठी काम करत होता आणि फरीदाबाद मधल्या अल फलाह मेडिकल कॉलेजमध्ये काम करत होता. ज्या I 20 कारमध्ये स्फोट झाला ती कार डॉ. उमर चालवत होता अशी माहितीही पोलिसांनी दिली आहे. १९ ऑक्टोबरला फरिदाबाद या ठिकाणी छापेमारीही झाली होती ज्यानंतर या कारवाईला घाबरुन उमर तिथून पळाला होता आणि त्याने जागा बदलल्या होत्या अशीही माहिती पोलिसांनी दिली. या कारचा मूळ मालक दिल्लीतला मोहम्मद सलमान हा आहे.

सलमाननं आपली कार ओखला भागातील नदीमला विकली. त्यानंतर नदीमने I-20 कार 'रॉयल कार झोन' या डीलरला विकली. दरम्यान या कारच्या खरेदी-विक्रीत बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला होता असे सांगितले जात आहे. दरम्यान पाकिस्तानच्या पत्रकार ताहा सिद्दीकी यांनी या घटनेबाबत धक्कादायक दावा केला आहे.

दिल्लीत झालेल्या कार स्फोटामागे आणि इस्लामाबादमध्ये झालेल्या स्फोटामागे पाकिस्तानी लष्कराचा हात आहे. दोन्ही स्फोटांमध्ये सुसाईड बॉम्बर्सचा वापर झाला. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख दहशतवादाचा वापर हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून वापरत आहेत. त्यामुळे दक्षिण आशियात शांतता नाही तर अशांतता आहे अशी पोस्ट ताहा सिद्दीकी यांनी लिहिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही कार पहिल्यांदा अल फलाह विद्यापीठाजवळ आढळून आली. रविवारी रात्री दोनच्या सुमारास ही कार या ठिकाणी आढळून आली.त्यानंतर बद्रापूर या ठिकाणी असलेल्या टोल नाक्यावरुन सकाळी ८ वाजून ३ मिनिटांनी पुढे गेल्याचं सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतं आहे.

### आय-२० कारमध्ये स्फोट

ज्या आय-२० कारमध्ये स्फोट झाला ती कार डॉ. उमर चालवत होता, अशी माहितीही पोलिसांनी दिली आहे. १९ ऑक्टोबरला फरिदाबाद या ठिकाणी छापेमारीही झाली होती ज्यानंतर या कारवाईला घाबरुन उमर तिथून पळाला होता आणि त्याने जागा बदलल्या होत्या अशीही माहिती पोलिसांनी दिली.

---

# घातपात करणाऱ्यांची गय नाही : राजनाथसिंह

## संरक्षणमंत्र्यांचा कठोर शिक्षा देण्याचा इशारा

**नवी दिल्ली :** "नवी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात मेट्रो स्टेशनाजवळ झालेल्या स्फोटासाठी जबाबदार असणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ केले जाणार नाही. त्यांना निश्चितच कठोर शिक्षा दिली जाईल," असा सज्जड इशारा संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी दिला. लाल किल्ला परिसरात मेट्रो स्टेशन क्रमांक एकजवळ काल सायंकाळी झालेल्या भीषण स्फोटामध्ये दहाहून अधिक मृत्युमुखी पडले.

या घटनेमुळे देशभरात चिंतेचे वातावरण असून सुरक्षा यंत्रणांनी स्फोटामागील सूत्रधारांचा तपास सुरू केला आहे. तसेच राष्ट्रीय राजधानी दिल्ली क्षेत्रात, त्याचप्रमाणे उत्तर प्रदेश, बिहार आणि मुंबईत सजगतेचा इशारा देण्यात आला असून गर्दीच्या तसेच धार्मिक स्थळांवर सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

स्फोटानंतर नवी दिल्ली-एनसीआर परिसरात सुरक्षा आणखी कडक करण्यात आली. 'एनएसजी' कमांडोना महत्त्वाच्या ठिकाणी तैनात करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून या घटनेचा संपूर्ण मागोवा घेऊन घातपात घडविणाऱ्या लोकांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी आज 'दिल्ली



डिफेन्स डायलॉग' कार्यक्रमात बोलताना या स्फोटात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केली. तसेच दोषींना कठोर शिक्षा होईल, असा इशारा दिला. ते म्हणाले, की तपास यंत्रणा तपास करत आहेत आणि त्याबाबतची माहिती जनतेसमोर येईल. दोषींना शिक्षा होईल आणि त्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. दरम्यान, राजनाथ सिंह यांनी सांगितले की, आज भारताची संरक्षण तयारी 'अदृश्य' तंत्रज्ञानावर अवलंबून आहे जी ऑपरेशनल कार्यक्षमता, सुरक्षित संप्रेषण आणि सशस्त्र दलांमध्ये समन्वय सुनिश्चित करते. या अदृश्य तंत्रज्ञानामध्ये सुरक्षित डेटा आर्किटेक्चर, एन्क्रिप्टेड नेटवर्क, स्वयंचलित देखभाल प्रणाली आदींचा समावेश आहे."नवी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात मेट्रो स्टेशनाजवळ झालेल्या स्फोटासाठी जबाबदार असणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ केले.

---

# 'ते' पाच टेरर डॉक्टर कोण?

## पोलोसानी शोधली व्हाईट कोट टेरर इको-सिस्टीम'

**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेल्या दहशतवादविरोधी मोहिमेत एका राज्याबाहेरील दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला.

त्यात चार डॉक्टर आणि एका मृत सदस्यासह अनेक संशयितांना अटक करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मीर पोलिस, हरियाणा पोलिस, उत्तर प्रदेश पोलिस आणि केंद्रीय एजन्सींच्या संयुक्त पथकांनी श्रीनगर, फरिदाबाद, सहारनपूर आणि इतर ठिकाणी संयुक्त छापे टाकून स्फोटके, बंदुका आणि बॉम्ब बनवण्याचे साहित्य मोठ्या प्रमाणात जप्त केले आहे. या सर्वांचा 'जैश-ए-मोहम्मद'शी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी ही 'व्हाईट कोट टेरर इको-सिस्टीम' शोधून



काढली. यातील सर्वजण शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आहेत. १९ ऑक्टोबर रोजी श्रीनगरच्या बनपोरा नौगाम भागात 'जैश-ए-मोहम्मद' (जेईएम) चे पोस्टर्स दिसल्यानंतर तपास सुरू झाला, ज्यामध्ये सुरक्षा दलांना धमकी देण्यात आली होती. पोलिसांनी एक 'व्हाईट कोट टेरर इको-सिस्टीम' शोधून काढली, ज्यामध्ये शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आणि विद्यार्थी यांचा समावेश होता, जो निधी, शस्त्रे आणि स्फोटके हलविण्यासाठी एन्क्रिप्टेड चॅनल आणि धर्मादाय आघाड्यांद्वारे समन्वय साधत होता.

---

# खतातून घडवला विध्वंसक स्फोट

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील रस्त्यावर एका थांबलेल्या कारमध्ये सोमवारी झालेल्या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जखमी झाले. तपास यंत्रणांच्या प्राथमिक तपास अहवालात स्फोट करण्यासाठी अमोनियम नायट्रेट इंधन तेल मिश्रण (एएनएफओ) व डिटोनेटर वापरला गेला असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अमोनियम नायट्रेट हे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असणारे नायट्रोजन खत विध्वंसक स्फोटास जबाबदार ठरले. अमोनियम नायट्रेट हे एक सामान्य खत व औद्योगिक रसायन; मात्र रासायनिकदृष्ट्या हे एक शक्तिशाली ऑक्सिडायझरही आहे, म्हणजे त्यात ज्वलनशील क्षमता नाही.

---

# दिल्ली स्फोटाशी संघाचा संबंध ?

## ॲड. प्रकाश आंबेडकरांचा खळबळजनक आरोप

अकोला : दिल्ली स्फोट हे सरकारचे पूर्णपणे अपयश आहे. सरकार मस्तीत आले होते. दिल्ली स्फोटात अंतर्गत की बाह्य शक्तीचा हात आहे? असा प्रश्न निर्माण होतो. ते म्हणतील की, अंतर्गत स्फोट झाले नाही, पण बाहेर स्फोट झाले आहेत. अंतर्गत स्फोटामध्ये जे काही साहित्य सापडले, ते संघाच्या कार्यकर्त्यांकडे सापडले आहे, असा खळबळजनक आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केला.

आंबेडकर म्हणाले की, सखोल चौकशी होऊन या प्रकारच्या घटना थांबल्या पाहिजे, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली. ॲड. प्रकाश आंबेडकरांनी अकोल्यात माध्यमांशी बोलतांना दिल्ली



बॉम्बस्फोट प्रकरणावर भाष्य केले. या घटनेवरून त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. संघ स्वयंसवेकांवर देखील त्यांनी आरोप केले. दिल्ली येथे लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या जवळ सोमवारी सायंकाळी भीषण स्फोट झाला. या स्फोटात १० जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, मृतांपैकी काही जणांच्या शरीराचे तुकडे झाले, ही बाब गंभीर आहे.

### मविआचे तेच सूत्रधार

महाविकास आघाडीचे कर्ता, धर्ता व सूत्रधार पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. मी राजकारणात काय करू शकतो ? १९८९ मध्ये दाखवून दिले. त्यावेळी भाजप देखील होती. नरेंद्र मोदी असेपर्यंत मला एकट्यालाच लढावे लागणार आहे, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली. भाजप एका पायावर मैत्री करण्यासाठी तयार आहे. पण त्यांच्यासोबत आम्हीच मैत्री करायला तयार नाही, असे ड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. सगळ्यांच्या दोऱ्या नरेंद्र मोदींच्या हातात आहेत.

---

# आळंदीत प्रशासकीय यंत्रणा युद्ध पातळीवर

## कार्तिकी यात्रा आणि निवडणुकीत पोलिसांची कसरत

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा १२ ते २० नोव्हेंबर दरम्यान आयोजित होत असून, याच काळात नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहिता लागू आहे. त्यामुळे प्रशासनाला यात्रा आणि निवडणूक दोन्ही तयारी एकत्र साधावी लागते. आळंदी नगरपरिषद, पोलिस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महावितरण, आळंदी ग्रामीण रुग्णालय आणि श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी यांनी नागरी सेवा सुविधांची कामे युद्ध पातळीवर सुरू केली आहेत. दर्शनबारी व्यवस्था तात्पुरती करण्यात आली असून भाविकांसाठी ८०० शौचालये, १९ पाणी टँकर, १८० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. अतिक्रमण पथक, आरोग्य व पाणी पुरवठा विभागांकडून साफसफाई आणि पावडर फवारणी नियमित केली जात आहे.

हवेली उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांच्या आदेशानुसार रथोत्सवाच्या काळात प्रदक्षिणा मार्गावर जनरेटरद्वारे अतिरिक्त रोषणाई करण्यात आली आहे. मंडप उभारणीसाठी जागेचे अधिग्रहण पूर्ण झाले आहे. स्वच्छतेसाठी वॉच टॉवर्स व अन्य सुविधा तैनात आहेत. नगरपरिषदेच्या माध्यमातून एक हजार प्रसाधनगृहे आणि ५ पाणी फिलिंग पॉइंट्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आळंदी ग्रामीण रुग्णालयात २४ तास सेवा सुरू ठेवण्यात आली आहे. सुरक्षेसाठी पोलिस विभागाने १५० अधिकारी, ९०० अंमलदार व ५०० अतिरिक्त कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त ठरविला असून एसआरपी तुकडी देखील तैनात आहे. महावितरणने यात्रा काळात अखंड विद्युत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी दुरुस्ती व देखभाल केली आहे. भाविक, वारकरी व नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि व्यवस्थित दर्शन अनुभव मिळावा आणि कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, असे नियोजन करण्यात आले आहे.

---




**वंचित-काँग्रेसचे जमले :** नांदेड जिल्ह्यातील सर्व स्थानिक निवडणुका सोबत लढण्याची घोषणा झाली,आता राज्यात प्रतीक्षा होत आहे.

---

# बिहारमध्ये एनडीएची सत्ता?

## भाजप जदयुला बंपर बहुमत

**मुंबई :** संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. या दुसऱ्या टप्प्यात सरासरी ६७. १४ टक्के मतदान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आता येत्या १४ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. याच दिवशी विदद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीए पुन्हा सरकार स्थापन करणार की, तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडी सत्तेवर येणार हे ठरणार आहे. दरम्यान, मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर विविध टीव्ही चॅनेल आणि एजन्सीज यांनी एक्झिट पोल जाहीर केले आहेत. त्यामध्ये बिहारमध्ये बंपर बहुमतासह एनडीएचे सरकार पुन्हा येणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे, तर महाआघाडीला मोठा धक्का बसण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पार्टीला फारसे यश मिळणार नसल्याचे एक्झिट पोलमधील आकडे सांगत आहेत. तसेच अपक्षांनाही मतदारांनी फारसे स्थान दिलेले नाही. बिहार विधानसभा निवडणुकीत एकूण २४३ जागांसाठी मतदारांनी आपल्या मताचा हक्क बजावला.

---

# जुन्या शिक्षकांना टीईटीचे 'शिवधनुष्य' पेलणार का?

## नोकरी जाण्याच्या भीतीचा अनेकांना धसका

**मुंबई :जुन्या, वयोवृद्ध आणि सेवानिवृत्तीचे वेध लागलेल्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा म्हणजे जणू काही 'शिवधनुष्य' ठरत आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांनी नोकरी जाण्याच्या भीतीने टीईटीचा धसकाच घेतल्याचे दिसत आहे.**



टीईटी परीक्षेच्या अभ्यासक्रमाची जी रचना करण्यात आली आहे, ती शिक्षकांची किमान आकलन शक्ती आणि विषयज्ञान आजमावण्याचा एक स्तुत्य उपक्रम आहे. त्याच अनुषंगाने अभ्यासक्रमाची आणि परीक्षेची रचना करण्यात आलेली आहे. १५० गुणांची, दीड तासांच्या वेळ मर्यादेची आणि बहुपर्यायी स्वरूपाची ही परीक्षा आहे. पहिली ते पाचवीपर्यंत शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी पेपर क्रमांक एक, सहावी ते आठवीपर्यंत शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी पेपर क्रमांक दोन आणि पहिली ते आठवी अशा कोणत्याही इयत्तेला शिकवू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी दोन्ही पेपर अनिवार्य ठेवण्यात आलेले आहेत. सामाजिक विज्ञान या अभ्यासक्रमावर आधारित पहिल्या पेपरमध्ये बालविकास आणि अध्यापनशास्त्र, परीक्षार्थीनि निवडलेल्या कोणत्याही दोन भाषा, गणित आणि पर्यावरण अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असतात. दुसऱ्या पेपरमध्ये बालविकास आणि अध्यापनशास्त्र, परीक्षार्थीने निवडलेल्या कोणत्याही दोन भाषा, गणित, विज्ञान किंवा प्रश्न असतात. प्रत्येकी एक माकचि एकूण १५० प्रश्न आणि सोडविण्याचा अवधी ९० मिनिटांचा आहे. म्हणजे सरासरी ३६ सेकंदांमध्ये एक प्रश्न सोडवत गेले पाहिजे, तरच सगळा पेपर सोडविणे शक्य आहे; पण जवळपास ९५ टोके परीक्षार्थींना वेळेत हा पेपर सोडविणे शक्यच होत नाही. शिवाय '३५ टक्के जिंदाबाद' असा इथे मामला नाही, तर ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के म्हणजे १५० पैकी ९० गुण मिळविणे अनिवार्य आहे. नव्या उमेदीचे शिक्षक, नव्या जोमाने अभ्यासक्रम आत्मसात करून परीक्षेत उत्तीर्ण होताना दिसतात; पण जुन्या आणि वयोवृद्ध शिक्षकांची या नवीन अभ्यासक्रमाशी जुळवून घेताना पुरती दमछाक होत आहे.

### गुरुजींचीच शाळा घेण्याची गरज..!

टीईटी अभ्यासक्रमाचे स्वरूप, परीक्षा पद्धती, गुणांकन पद्धत याबाबत अद्यापही राज्यातील शिक्षकांना फारशी माहिती असलेली दिसत नाही. शिवाय शासनानेही त्यासाठी एखादी स्वतंत्र यंत्रणा उभारलेली दिसत नाही. त्यामुळे सध्या तरी खुल्या बाजारात टीईटी परीक्षेसाठी उपलब्ध असलेल्या पुस्तकांवरच भिस्त ठेवून शिक्षकांना त्याचा अभ्यास करावा लागत आहे. पण, शासकीय पातळीवरून या विषयांच्या अभ्यासासाठी तालुका किंवा जिल्हानिहाय 'शिक्षकांच्या शाळा' भरविण्याची आवश्यकता आहे.

---

# अखेर पार्थ पवार प्रकरणावर शरद पवार पहिल्यांदा बोलले

**अकोला :** पुणे येथील जमीन व्यवहार प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर आरोप होत आहेत. यावरून विरोधक राज्य सरकारच्या कारभारावर आरोप करत असल्याने राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. त्यातच आता या प्रकरणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मोठे वक्तव्य केले असून मुंढवा येथील जमीनप्रकरणाची चौकशी करून वास्तव समोर आणा, अशी मागणी त्यांनी केली आहे. अकोल्यातील पत्रकार परिषदेवेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधत विविध प्रश्नांना उत्तरे दिली. पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल झाला नाही? या प्रश्नाचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच देऊ शकतील. या प्रकरणाची फडणवीस यांनी चौकशी करायला हवी, अशी मागणीही शरद पवार यांनी केली.

पार्थ पवार प्रकरणात चौकशी करून वास्तव समोर ठेवावे. मुंढवा येथील जमीन प्रकरणाची चौकशी करून वास्तव समोर आणा. त्यासोबतच सुप्रिया सुळे यांची पार्थ पवार यांच्याबद्दलची भूमिका ही वैयक्तिक असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सुप्रिया सुळे (Supriya sule) यांनी जमीन व्यवहार प्रकरणात पार्थ पवार काही चुकीचे करणार नसल्याचे प्रसार माध्यमाशी बोलताना स्पष्ट केले होते.

मुंढवा येथील जमीन प्रकरणातील कोण तेजवानी हे मला माहित नाही. त्यापासून मी दूर आहे. या प्रकरणाची चौकशी करून राज्य सरकारने दोषींवर कारवाई केली पाहिजे, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. आमच्या पक्षात सर्वांना विचारून निर्णय घेतले जातात. त्यासोबतच सामूहिकही निर्णय घेतले जातात, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर मतचोरी होत असल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे येत्या काळात जर व्हीव्हीपॅटवर मतदान झाले तर मतदानावर शंका घेता येणार नाही. काँग्रेसचे नेते राहुल गांधींचे चांगले काम करीत असल्याचेही शरद पवार म्हणाले.

राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिले जात असलेले कर्जमाफीचे आश्वासन ही शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक असल्याचेही शरद पवार यांनी स्पष्ट केले.